# विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण

शिर्डी-कोपरगांव रोड, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर, पिन-४२३६०१, मो. ९३७२९५१०१४

## निविदा सूचना

या संस्थेच्या आत्मा मालिक माध्यमिक गुरुकुल इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर अंदाजे २१२५८ स्क्वेअर फुटाचे पीईबी प्रकारचे शेड बांधकाम करण्यासाठी मान्यताप्राप्त ठेकेदार यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर शेडची रुंदी ९० फुट असून लांबी २३६ फुट इतकी आहे. निविदा अर्ज विहीत कागदपत्रांसह बंद लिफाफ्यात दि. २६/०३/२०२३ रोजी सायं. ५:०० पर्यंत संस्थेच्या वरील पत्त्यावर सादर करावा.

**निविदा अर्ज आणि अटी शर्ती या संस्थेच्या www.atmamalikonline.com वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**अध्यक्ष**, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण




RIGID FRAME ELEVATION

Scanned with OKEN Scanner




PROPOSED PLAN

Scanned with OKEN Scanner

# अध्यक्ष,विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट,कोकमठाण यांचेकडून

## निविदाधारक यांना पत्र

दिनांक -१८/०३/२०२३

आत्मा मालिक माध्यमिक गुरूकूल इमारतीच्या तिस-या मजल्यावर अंदाजे २१२५८ स्क्वेअर फुटाचे पीईबी प्रकारचे शेड बांधकाम करण्यासाठी मान्यताप्राप्त ठेकेदार यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहे.सदर शेडची रुंदी ९० फुट असून लांबी २३६ फुट इतकी आहे.या कामासाठी निविदा भरून सादर करण्यापुर्वी खालील सूचनांचे पालन करावे.

१. कोरे निविदा फॉर्म संस्थेच्या मुख्य कार्यालयात दिनांक १८/०३/२०२३ पासून उपलब्ध आहेत. कोरे निविदा फॉर्म रूपये १०००/- रोख भरुन प्राप्त करता येतील.

२. पीईबी प्रकारचे कामाचा अनुभव असणारे ठेकेदार यांनी मागील तीन वर्षामध्ये रुपये तीन कोटी पर्यंत काम केल्याचे अनुभव आवश्यक आहे.

३. निविदा फॉर्म भरुन सादर करताना क्रमांक १ च्या लिफाफ्यात बायणा रकमेचा डि डि अथवा आरटीजीएस चलन व मागणी नुसार कागदपत्रे असावीत. क्रमांक २ चे लिफाफ्यात दरपत्रक/ मुळ निविदा सादर करावी. प्रथम क्र.१ चा लिफाफा उघडून मागणीप्रमाणे कागदपत्रे असल्याच क्रमांक २ चा लिफाफा उघडण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४. निविदा फॉर्म भरुन संस्थेच्या मुख्य कार्यालयात दिनांक २६/०३/२०२३ सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत जमा करता येईल.उशीरा आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

५. निविदा धारकास रुपये २०००००/- (दोन लाख) बयाणा रक्कम म्हणून निविदेसोबत भरावी लागेल. निविदा नामंजूर झाल्यास एक महिण्याचे कालावधीनंतर सदर रक्कम परत करण्यात येईल.

६. बयाणा रक्कम ***विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट यांचे बॅक ऑफ महाराष्ट्र ,कोकमठाण या शाखेतील खाते नंबर ६०११३१८२६७७ , IFSC-MAHB0001611*** या या खात्यावर जमा करता येईल.धनादेश स्विकारला जाणार नाही.

७. बयाणा रकमेची मुळ पावती किंवा चलन स्वतंत्र पाकीटात कागदपत्रांचे सोबत जोडावी.पावतीची झेरॉक्स जोडू नये.

८. पुर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत व विहीत पध्दतीने सादर करण्याची जबाबदारी निविदाधारकावर आहे.

९. कमी/जास्त दराची कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ट्रस्ट व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.त्याबददलची कारणे देणे ट्रस्ट व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

१०. मुदतीत न आलेल्या आणि अपुर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

११. प्रत्यक्ष कामाचे ठिकाण पाहणेसाठी आणि तांत्रिक बाबी समजून घेणेसाठी ट्रस्टचे इंजिनिअर श्री.आकाश साठे आणि श्री.प्रशांत परदेशी यांचेसी संपर्क करून घेता येतिल.

कळावे

अध्यक्ष

विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट

कोकमठाण

Vishwatmak Jangli Maharaj Ashram Trust
Reg. No. E-500 Nashik Dt. 5/2/1987

# विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण
# तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर
## निविदेच्या शर्ती व अटी

१. निविदेप्रमाणे फॉर्ममध्ये नेमूण दिलेल्या ठिकाणी दर नमुद करुन त्याखाली सही शिक्यानिशी मुळ दरांची निविदा नेमूण दिलेल्या कार्यपध्दतीनूसार कार्यालयात जमा करावयाची आहे.(झेरॉक्स प्रत ग्राहय धरली जाणार नाही.)

२. एकाच व्यक्तीस वेगवेगळया फर्ममधुन निविदेमध्ये भाग घेता येणार नाही. तसे आढळल्यास निविदा रद्द करणेत येईल.

३. सरकारी नियमानुसार आवश्यक तेथे आयकर कपात केली जाईल.

४. निविदेसोबत रुपये २,००,०००/– रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट अथवा रोख भरण्याची पावती, दुकान नोंदणी दाखला, सेल्स टॅक्स/सेंट्रल टॅक्स दाखला, जीएसटी/टिन नंबर, पॅन कार्ड इत्यादींचा साक्षांकित केलेल्या सत्यप्रती स्वतंत्र क्र.१ चे पाकिटात सादर कराव्यात. अन्यथा निविदा नाकारली जाईल.

५. दरपत्रकाची मूळ निविदा स्वतंत्र माहोरबंद पाकिटात(साईज १४.५''x १२'') सादर करावी. पाकिटावर पाकिट क्रमांक २ असा स्पष्ट उल्लेख करुन पाठविणाऱ्यांचा पत्ता व दुरध्वनी क्रमांक नमुद करावा. तसेच पाकिट क्र १ ( १४'' x १०'') मध्ये बयाणा रक्कमेची पावती व इतर सर्व कागदपत्रे सादर करावीत. दोन्ही पाकिटे परस्परांना संलग्न करुन दिनांक २६.०३.२०२३ दु. ५.०० वा. पर्यंत विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे आवक विभागात सादर करावीत. प्रथम पाकिट क्र. १ उघडून त्यातील कागदपत्रे मागणीनुसार बरोबर असल्यासच पाकिट क्र. २ (निविदा पाकिट) उघडले जाईल, अन्यथा निविदा पाकिट उघडले जाणार नाही. पूर्वीच्या निविदेसोबत दिलेली कागदपत्रे व बयाणा रक्कम विचारात घेतली जाणार नाहीत.

६. कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क ट्रस्टने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे ट्रस्टवर बंधनकारक असणार नाही.

७. निविदा मंजूर झाल्याचे कळविलेपासून ५ दिवसांत समक्ष येवून रु. १००/– चे स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करुन दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास, निविदाधारकाने सादर केलेली निविदा रद्द म्हणून गणण्यांत येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही.

८. मंजूर झालेल्या मान्य दराने व ड्राईंग आणि डिझाईन प्रमाणे कामपुर्ण करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. निविदाधारकाने काम करण्यास नाकारल्यास पुर्णत:/अंशत: सुरक्षा अनामत रक्कम ट्रस्ट खाती जमा करणेत येईल.

९. कामाचे डिझाईन हे ट्रस्टने दिल्याप्रमाणे किंवा मंजूर निविदाधारकाने तयार करून ट्रस्टने मान्यता दिल्यानंतर त्यानुसार काम सुरू करता येईल.

१०. कामासाठी वेळेची मर्यादा ही दोन महिण्यांची असल्याने त्यात कोणत्याही कारणास्तव वेळ वाढून देता येणार नाही.वेळेत काम न झाल्यास ट्रस्ट ठरविल त्याप्रमाणे दंडात्मक कार्यावाही करण्यात येईल.

११. सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो कोपरगांव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

१२. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणेचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्यांचा अधिकार ट्रस्ट व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकांची कोणतीही अट/अटी ट्रस्टवर बंधकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.

Jangli Maharaj Ashram Trust, Kokamthan
Reg. No. E-500 Nashik Dt. 5/2/1987

**सरचिटणीस/ अध्यक्ष**
**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट,**
**कोकमठाण**